ORIGINAL ARTICLE ISSN:- 2249-894X

Review Of Research

# “आदिवासी समाजाचे आर्थिक व सांस्कृतिक लोकजीवन”

सारांश:

आधुनिक युगात औद्योगिकीकरण, शहरीकरण वेगाने वाढत आहे. नागरीकरणामुळे ग्रामीण भागाचा आर्थिक आणि औद्योगिक विकास वेगाने होत आहे. भारतासह संपूर्ण जगात विविध जातीधर्माचे लोक राहतात. प्राचीन काळी मानव पृथ्वीतलावर इतर सजीवांप्रमाणे जंगलात, गुहेत राहून वनसंकलन व शिकार या प्राथमिक श्रेणीतील व्यवसायांवर आपली गुजराण करीत होता. काळाच्या ओघात विज्ञानावर आधारीत तंत्रज्ञानात प्रगती झाल्यावर मानवाने निसर्गनिर्मित कच्च्या वस्तुंवर कारखान्यात प्रक्रिया करून त्या अधिक टिकाऊ बनवल्या आहेत.





आर. एम्. थोरात

द. ग. तटकरे महाविद्यालय, तळा, जि. रायगड.



### प्रस्तावना :–

थोडक्यात मानवाने पृथ्वीतलावर स्वतः जीवन सुखी, समृद्ध बनविण्यासाठी नैसर्गिक पर्यावरणात प्राचीन काळापासून गुजराण करणाऱ्या आदिवासी जमातीचे नैसर्गिक आश्रयस्थान नष्ट केले आहे. आदिवासी जमातीचे प्राचीन व्यवसाय, मानवी संस्कृती, निसर्गावर आधारीत अर्थव्यवस्था नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. आजही महाराष्ट्रात दुर्गम, डोंगराळ प्रदेशात तसेच सागर किनाऱ्यालगत आदिवासी समाजाचे वास्तव्य आहे. यामध्ये कातकरी, ठाकर, महादेव कोळी, पावरा भिल्ल, कोरकु, गोंड, पारधी, वारली या आदिवासी समुदायाचा समावेश होतो. जागतिकीकरण, औद्योगिकिकरण, शहरीकरणाच्या युगात आदिवासी जमातीचा पारंपारिक, सांस्कृतिक, आर्थिक दृष्टीकोनातून देशाच्या अर्थकारणातील सहभाग तपासण्यासाठी प्रस्तूत शोध निबंधात प्रामाणिक प्रयत्न करण्यात येणार आहे. भारताचा सर्वांगिण आर्थिक विकास हा आदिवासी जमातीच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक विकासावर अवलंबून आहे. त्यामुळे आदिवासी जमातीकडे दुर्लक्ष करून भारताला आर्थिक विकास करता येणार नाही.

### संशोधनाचा उद्देश:–

1.जागतिकीकरणाच्या युगात आदिवासी समाजाचा देशाच्या आर्थिक विकासातील सहभाग तपासणे.
2.आदिवासी समाजातील सांस्कृतिक लोकजीवनाचा अभ्यास करणे.
3.औद्योगिकीकरण व नागरीकरणाच्या युगातील आदिवासी जमातीच्या वाढत्या समस्यांचा आढावा घेणे.
4.आदिवासी जमातींना देशाच्या राष्ट्रीय विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी उपाययोजना सुचविणे.
5.आदिवासी जमातीतील शैक्षणिक विकासाची पातळी तपासणे.

### संशोधन पद्धती:–

सदर शोध निबंधात व्दितीयक माहिती स्त्रोताचा उपयोग करण्यात आला आहे. सदर माहिती जिल्हा जनगणना पुस्तिका, जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, जिल्हा राजपत्र, संदर्भ ग्रंथ, मासिके यांचा वापर करून माहिती संकलित केली आहे.

### आदिवासी समाजाचा सांस्कृतिक विकास:–

19 व्या शतकात ब्रिटनमध्ये औद्योगिक क्रांती झाली.कापसापासून कापड बनविण्यात येऊ लागले. औद्योगिक क्रांतीचे लोण हळुहळू जगभर पसरले.कच्च्या वस्तूंपासून पक्क्या वस्तू तयार होऊ लागल्या. 21 व्या शतकातील वाढत्या आद्योगिकीकरण, नागरीकरीण प्रक्रियेमुळे ग्रामीण भागातील आदिवासी जमातीचा पाश्चिमात्य जगाशी संपर्क येऊ लागला. आदिवासी समाजातील लोकांनी सांस्कृतिकदृष्ट्या विकसीत समाजातील चालीरिती, सणउत्सव, रूढी, परंपरा यांचा स्वीकार करून आचरण करायला सुरूवात केली आहे. पुर्वीच्या काळात कातकरी, ठाकर, महादेव कोळी, गोंड, वारली या आदिवासी जमातीतील लोक उदरनिर्वाहासाठी पर्यावरणातील वनसंकलनावर अवलंबून होते. आज अनेक आदिवासी लोक शहरी भागात मिळेल ते काम करीत आहेत. त्याचबरोबर ग्रामीण भागातील शेती व शेतीवर आधारीत व्यवसायात काम करताना आढळतात.आदिवासी जमातीचा पोशाख, आहार, रिती–रिवाज यात सामाजिक परिवर्तनाबरोबर बदल होत आहेत. अनेक आदिवासी प्रादेशिक बोलीभाषा दैनंदिन व्यवहारासाठी वापरताना आढळतात. सणउत्सवात हे आदिवासी आपआपसात संभाषण करण्यासाठी बोलीभाषा वापरतात.

प्रशासनाने आदिवासींच्या सर्वांगिण विकासासाठी विविध योजना अंमलात आणल्यामुळे आदिवासींचा सामाजिक व सांस्कृतिक विकास हळुहळू होताना दिसत आहे. आदिवासी करमणुकीचे साधन म्हणून दृक–श्राव्य साधनांचा वापर करतात. पुर्वी ते लैंगिक सुखालाच करमणूक मानत होते. त्यामुळे जननदर व मृत्युदर जास्त होता. सण–उत्सव व लग्न सोहळ्यात दारू पिऊन पारंपारिक लोकनृत्य सादर करण्यात आदिवासींना आजही आनंद वाटतो. आजही अनेक आदिवासी जमाती डोंगराळ व दुर्गम अरण्यात अतिशय मागासलेले खडतर जीवन व्यथित करीत आहेत. यामध्ये नागा, टोडा, मसाई, बदाऊन, किरगिझ इ. जागतिक पातळीवरील आदिवासी जातीजमातींचा समावेश होतो. नागालॅंडमधील नागा आदिवासी जमातीतील नागा युवक व युवती वयाच्या सोळाव्या वर्षापर्यंत कोणतेही वस्त्र परिधान करीत नाहीत. पाश्चिमात्य जगापासून ते फार दूर असून आपली वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती जपून आहेत.

### 4.आदिवासी समाजाचा आर्थिक विकास:–

प्रगत समाजापेक्षा आदिवासी जमात आर्थिकदृष्ट्या फारच मागासलेले जीवन जगतात. त्यांना त्यांच्या किमान जीवनावश्यक गरजादेखील भागवता येत नाहीत. नागा, टोडा, मसाई, कातकरी, गोंड, पारधी या आदिवासी जमातीतील लोक अतिशय निकृष्ट आहार सेवन करतात.त्यामुळे त्यांचे सरासरी आयुर्मान 40 ते 50 वर्षापर्यंत आहे. अनेक आदिवासी दारूच्या आहारी गेलेले आढळतात. आठवडा बाजारात ते सहपरिवार दारू सेवन करतात. त्यांच्या दैनंदिन उत्पन्नाचा अर्धा भाग ते दारू पिण्यावर खर्च करतात.त्यामुळे आदिवासी आर्थिक बचत करताना फारसे आढळत नाहीत. पैसा व अन्नधान्याचा साठा करताना आदिवासी आढळत नाहीत.त्यांच्या मालकीचे फक्त नैसर्गिक पर्यावरणातील वनस्पती, पशुपक्षी असतात. वनसंकलन व शिकारीवर ते आपली गुजराण करतात.

केंद्र व राज्य सरकारने पंचवार्षिक योजनांच्या काळात 1951–52 पासून आजपर्यंत आदिवासी जमातींना देशाच्या आर्थिक विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी विविध योजना सुरू करून अंमलात आणल्या आहेत. परंतू लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय कर्मचारी वर्गाकडून त्या विकास योजना आदिवासींच्या झोपडीपर्यंत व्यवस्थित

पोहचल्या नाहीत. खरा आदिवासी समाज प्रशासकीय योजनांपासून वंचित आहे. त्याला अकार्यक्षम प्रशासन यंत्रणा जबाबदार आहे. मुळनिवासी असणारे आदिवासी आजही जीवनावश्यक गरजा भागविण्यासाठी वणवण भटकत आहेत.

आदिवासी जमातीतील काही बोटावर मोजण्याएवढे लोक, शेती, पशुपालन, आणि आरक्षणामुळे प्रशासकीय सेवेत काम करताना आढळतात. वाढत्या लोकसंख्येमुळे बेसुमार वृक्षतोड करून औद्योगिकीकरण व नागरीकरण होत असल्यामुळे ग्रामीण भागातील आदिवासींची उपासमार होत आहे. आदिवासींची वनसंस्कृती नष्ट होत आहे. सागर किनाऱ्यावरील काही कोळी मासेमारी करतात. थोडक्यात आदिवासी समाजातील नागरीकांची आर्थिक परिस्थिती फारच चिंताजनक आहे. आदिवासींच्या जीवनावश्यक गरजा पुरविणे हे प्रशासनाचे कर्तव्य आहे. अनेक व्यावसायिक, उद्योगपतींनी आदिवासींना फसवून त्यांच्या जमिनी बळकावल्या आहेत. पुणे जिल्ह्यातील 'लवासा प्रकल्प' हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. आदिवासी समाजातील लोकांचा शिक्षणातील सहभाग फारच कमी आहे. त्यासाठी आदिवासी समाजात जनजागृती करण्याची गरज आहे.

### *6. आदिवासी जमातींच्या विकासासाठी उपाययोजनाः—*

1. आदिवासी समाजातील लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देवून त्यांचा शिक्षणातील सहभाग वाढविणे.
2. प्रशासनाच्या विविध योजना आदिवासी जमातीच्या झोपडीपर्यंत पोहचविणे.
3. आदिवासी विकास योजनांची अंमलबजावणी योग्य प्रकारे झाली की नाही याचा फेर आढावा घेणे.
4. आदिवासी समाजाचा प्रादेशिक विकासातील सहभाग वाढविण्यासाठी प्रयत्न करणे.
5. आदिवासी जमातींचा लोकप्रशासनातील सहभाग वाढविणे.
6. आदिवासी समाजाचे आयुर्मान वाढविण्यासाठी आरोग्य विषयक सुविधा आणि सकस पोषण आहार पुरविणे.
7. आदिवासी जमातीतील लोकांचा कृषी, पशुपालन, कृषीवर आधारित व्यवसायातील सहभाग वाढविण्यासाठी प्रयत्न करणे.